# सात महिन्यांमध्ये ५८ टक्के काम पूर्ण

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

- दोन महिन्यांत २० टक्के पूर्णत्वाचे लक्ष्य
- आरे कारशेडची उच्चाधिकाऱ्यांकडून पाहणी

एप्रिल महिन्यामध्ये फक्त २२ टक्के पूर्ण झालेले मेट्रो ३ मार्गिकेच्या आरे कारशेडचे काम सात महिन्यांत ८० टक्केवर पोहोचले आहे. मात्र या मार्गिकेचा पहिला टप्पा डिसेंबरमध्ये सुरू करायचा असल्याने दोन महिन्यांमध्ये २० टक्के काम पूर्ण करण्याचे आव्हान आहे.

मेट्रो ३ ही मुंबईतील पश्चिम उपनगरांना उत्तरेकडे आरे ते दक्षिणेकडे कफ परेडपर्यंत जोडणारी राज्यातील पहिली भूमिगत मेट्रो मार्गिका आहे. ३३ किमीच्या या मार्गिकेवर २६ भूमिगत व एका जमिनीवरील स्थानकाचा समावेश आहे. या मार्गिकेचा पहिला टप्पा आरे ते बीकेसी असा असून त्यामध्ये दहा

मटा मागोवा

स्थानके असतील. मात्र मार्गिकेतील गाड्यांच्या दुरुस्तीसाठी आरे येथील कारशेड अत्याधिक महत्त्वाचे आहे. जमिनीसंबंधी वादामुळे कारशेड उभारणीला विलंब होऊन हे काम रेंगाळले होते. आता मात्र ते झपाट्याने केले जात आहे.

ही मार्गिका उभी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे यांच्यासह कंपनीचे संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता आणि संचालक (प्रणाली) राजीव दीर यांनी आरे कारशेडला भेट देऊन कामाची पाहणी केली. त्यामध्ये रूळ उभारणी, नियंत्रण कक्ष इमारत, स्थानक इमारत, मेट्रो संचालन नियंत्रण कक्ष आदींचा आढावा घेण्यात आला. कारशेडचे काम ७९.०१ टक्के पूर्ण झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.